# सुनीताबाई आणि मी

**सप्टेंबर १९५८ :**

स्कॉटलंडच्या ऐतिहासिक राजधानी एडिनबरोमध्ये चालू असलेल्या सांस्कृतिक महोत्सवात मी हजेरी लावली होती. माझ्याबरोबर सहाध्यायी शशीकुमार चित्रे होते. महोत्सवातले बहुतेक कार्यक्रम (नाटक, कॉन्सर्ट, ऑपेरा, बॅले आदी) सायंकाळी असल्याने सकाळ-दुपार शहराचे प्रेक्षणीय भाग पाहायला आम्ही भटकत असू. अशाच एका भटकंतीत आम्ही शहराच्या राजमार्गावर, प्रिंसेस स्ट्रीटवर फिरत असताना काही मराठी शब्द कानावर पडले.



सौ. मंगला नारळीकर, श्रीमती सुनीता देशपांडे व डॉ. जयंत नारळीकर

(हा दुर्मिळ फोटो दिल्याबद्दल सुप्रसिद्ध फोटोग्राफर मोहन वाघ यांचे आभार)

वळून पाहिले तर एक भारतीय दांपत्य उभे राहून आमच्या कडे बघत होते. पुरुषाचा चेहरा ओळखीचा वाटला.

''हे पु.ल. देशपांडे असावेत'' चित्रे यांनी तर्क केला. ते मुंबईत वाढले असल्याने त्यांना 'पुल' स्टेजवरून परिचित होते. मी बनारसचा. पण तेथे अधून मधून येणाऱ्या खास मराठी चित्रपटांपैकी 'गुळाचा गणपती' स्मृतिपटलावर आला आणि माझीही ट्यूबलाइट पेटली.

आम्ही त्यांना जाऊन भेटलो तेव्हा तर्क खरा ठरला. भारत सरकारतर्फे टेलिव्हिजन ह्या माध्यमाबद्दल अधिक माहिती मिळवायला त्यांना पाठवण्यात आले होते. साहजिकच एडिनबरा फेस्टिव्हलचे कार्यक्रम आणि त्यांचे टीव्ही प्रक्षेपण त्यांना जवळून पाहायचे होते. आम्ही दोघांनी त्यांना केंब्रिजला येण्यासंबंधी विचारले. ''आम्ही दोघे तेथे शिकत आहोत. ती प्रसिद्ध युनिव्हर्सिटी तुम्हा दोघांना दाखवायला आम्हाला आवडेल.'' आम्ही त्यांना आमंत्रण दिले.

''हो, येतो की...ऑक्सफर्ड-केंब्रिज आमच्या लिस्टवर आहेतच.'' पु. ल. म्हणाले. त्यांचा निरोप घेत आम्ही निघालो, तेव्हा सुनीताबाईंनी विचारले, ''नारळीकर, तुमचा केंब्रिजमधला पत्ता द्या म्हणजे आम्ही तुम्हाला केव्हा येणार ते पत्राने कळवू!'' पुलंच्या गप्पांना सुरुंग लावणारा हा आवश्यक प्रश्न होता.

मी माझा पत्ता दिला, तेव्हा जाणवले की पु.लं.च्या व्यावहारिक बाबी सुनीताबाई सांभाळतात.

***

ठरल्याप्रमाणे केंब्रिज पाहायला पु. ल. आणि सुनीताबाई आले, तेव्हा चित्रे आणि मी दोघांनी त्यांना 'दोन दिवसांचे केंब्रिज' दाखवायचे ठरवले. केंब्रिज पाहायला येणारे अनेक पाहुणे येऊन गेले. कोणाला किती वेळ उपलब्ध आहे हे पाहून आम्ही केंब्रिजदर्शनाचा प्लॅन आखत असू.

सिनेट हाऊस (जिथून गणिताच्या परीक्षेचे निकाल वाचून जाहीर केले जातात), किंग्ज चॅपल (६व्या हेन्रीने बांधायला घेतलेली भव्य इमारत जी ८व्या हेन्रीने पूर्ण केली.) कॉलेज बॅक्स, कॅम नदीवर 'पंटिंग' आदी दाखवून झाल्यावर सुनीताबाईंनी युनिव्हर्सिटी चर्चमधील प्रार्थनांचा कार्यक्रम पाहायची इच्छा व्यक्त केली. त्या दिवशी युनिव्हर्सिटीचे धर्मगुरू कॅनॉन स्टॉकवुड यांनी दक्षिण अफ्रिकेचे उदाहरण देऊन वर्णभेदाची निंदा करणारा झणझणीत धर्मपाठ (सर्मन) दिला.

त्या संध्याकाळी लंडनची ट्रेन गाठायला केंब्रिज स्टेशन

A cat has 32 muscles in each ear.

गाठण्यापूर्वी सुनीताबाईंनी झकास सूचना केली, ''भाई, तू ह्यांना चिंतन वाचून दाखव.'' तेव्हा चित्र्यांच्या खोलीत चहा-पेस्ट्री-केकवर ताव मारत आम्हाला पु.लं.नी बटाट्याच्या चाळीतर्फे केलेले चिंतन ऐकवले. तो एक संस्मरणीय प्रसंग होता.

***

१९७२ मध्ये मी मुंबईत टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चमध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झालो. अधूनमधून पु. लं.च्या एखाद्या कार्यक्रमाला जाण्याचा प्रसंग येई. पण प्रत्यक्ष भेटी-गप्पांचा योग आला नाही. पण १९८३ मध्ये माझ्या घरी फोन आला. वेळ असेल सकाळी ८ ची. फोनवर सुनीताबाई होत्या.

''अभिनंदन, जयंतराव!'' त्या उद्‌गारल्या.

''धन्यवाद... पण कशासाठी?'' मी विचारले.

''ते कळेल लवकरच! थांबा, भाईपण बोलू इच्छितात.'' त्यांनी फोन पु. लं.कडे दिला.

''अभिनंदन जयंतराव!'' त्यांनी सुनीताबाईंचीच रेकॉर्ड लावली. कदाचित अभिनंदनाचे कारण त्यांच्याकडून कळले असेल असे मला वाटले. पण माझ्या प्रश्नाला त्यानीही 'कळेल लवकरच' असे हसत सांगून रिसीव्हर खाली ठेवला.

त्या दिवशी संध्याकाळी फाय फाऊंडेशनतर्फे पुरस्कारांची घोषणा झाली. त्यांचे सर्वोच्च पारितोषिक 'राष्ट्रभूषण पुरस्कार' मला मिळाले होते. तेव्हा मला कळला, 'कळेल लवकरच' चा अर्थ !

***

मी १९८९ साली 'आयुका'च्या स्थापनेसाठी मुंबईहून पुण्याला स्थलांतर केले. पुढील ५-६ वर्षे आयुकाचा एक उच्च दर्जाची शिक्षण संशोधन संस्था म्हणून जम बसविण्यात गेली. त्याचबरोबर विज्ञानप्रसारासाठीही ह्या संस्थेचा नावलौकिक वाढू लागला. अशा काळात देशपांडे दांपत्त्य आयुकाला भेट देऊन गेले. त्यांना मी शालेय विद्यार्थ्यांसाठी राबवले जाणारे काही उपक्रम दाखवले व त्यांनी त्याचे तोंड भरून कौतुक केले.

हे कौतुक केवळ तोंडदेखले नव्हते याची मला पुढे जाणीव झाली. सुनीताबाईंनी मला भेटायला बोलवून आयुकाच्या जनसंपर्काशी, विशेषत: शालेय मुलांसाठी जोडलेल्या उपक्रमांना आर्थिक सहाय्य देऊ केले. त्या वेळी पु. ल. व्हीलचेअरवर अवलंबून राहण्याच्या स्थितीत होते. त्यांची एकेकाळी ऐकणाऱ्याला मंत्रमुग्ध करणारी किंवा हास्यरसात बुडवणारी वाचा खंडित झाली होती. पण त्यांचीदेखील ह्या देणगीला मान्यता आहे असे सुनीताबाईंनी सांगितले.

ही देणगी देण्यासाठी व घेण्यासाठी स्टॅम्पपेपरवर सुनीताबाईंची व माझी सही घ्यायची होती. मसुद्यात त्यांचा नावाने उल्लेख होता. 'सुनीताबाई देशपांडे'. त्यांनी त्यावर बोट ठेवून विचारले. 'इथे नावानंतर 'बाई' कशाला?''

मी उत्तरलो, ''ती आमचा आदर व्यक्त करणारी संज्ञा समजावी.'' तेव्हा माझ्या नामोल्लेखावर त्या उद्‌गारल्या, ''मग इथे 'जयंत' कशाला... 'जयंतराव' का नको? 'वयाने आपण माझ्याहून ज्येष्ठ म्हणून हा फरक' हे मी केलेले समाधान कितपत समाधानकारक होते ते सांगता येत नाही.

त्यानंतर वर्षभरात देणगीतून 'पुलस्त्य' ही इमारत आयुका परिसरात उभी राहिली. हळूहळू तिथे शालेय विद्यार्थ्यांचा राबता वाढला. खेळातून विज्ञान, दुर्बिणीतून आकाशदर्शन, आदी कार्यक्रम लोकप्रिय झाले. मी सुनीताबाईंना त्यांची सचित्र माहिती पुरवीत होतो पण प्रकृती-अस्वास्थ्याचे कारण पुढे करून त्या नकार देत होत्या. अखेर १८ जून २००७ रोजी पुलत्स्यला भेट देण्याचे त्यांनी मान्य केले. त्यांच्याबरोबर त्यांचे भाचे प्रा. दिनेश ठाकूर आणि नातू अश्विन लोकरे आले होते. मुलांच्यासाठी चालू असलेले प्रबोधनाचे कार्यक्रम आणि 'पुलत्स्य'मधील एकंदर साधन-सामग्री-सुविधा पाहून सुनीताबाईंना समाधान झालेले पाहून मला कृतकृत्य वाटले. त्यावेळी पु. लं. हयात असते तर.... असे राहून राहून वाटत होते.

***

ऑक्टोबर २००८ मधली गोष्ट. सुनीताबाईंची प्रकृती बरीच खालावली आहे हे कळल्यावर सौ. मंगला आणि मी त्यांना भेटायला गेलो. त्यांना अर्धवट झोपेत बिछान्यावर पडलेले पाहून मन हेलावले. अनेक पराक्रम गाजवणारा भीष्मदेखील अखेर शरपंजरी पडला. तडफदार, स्पष्टवक्त्या, अनेक सांस्कृतिक क्षेत्रात स्वत:चा ठसा उमटवणाऱ्या त्याच त्या सुनीताबाई...?

सुनीताबाईंनी डोळे उघडून स्मित करत ओळख दिली आणि विचारले ''जयंतराव अलीकडे कोणते लिखाण केले?''

''माझे आत्मचरित्र 'मौज'कडे प्रकाशनासाठी दिले आहे'' मी उत्तरलो. किंचित थांबून सुनीताबाई म्हणाल्या, ''लोकांना माहीत नसलेले आणि सांगण्याजोगे तुमच्या चरित्रात काही उरले आहे का?''

शरपंजरी पडलेला भीष्म बिनचूक बाण मारू शकतो याची मला जाणीव झाली.

**पद्मविभूषण डॉ. जयंत नारळीकर**

संस्थापक - आयुका, पुणे व सन्माननीय नृपो सदस्य

An ostrich's eye is bigger than its brain.